

# नवनीत

मे 2022

# मुखपृष्ठाविषयी



भारत–पाकिस्तान शांतता व सद्‌भावनेसाठी प्रयत्नशील असलेली भारतातील एक महत्त्वाची चळवळ म्हणजे आगाज़ –ए– दोस्ती. गेली १० वर्षे यांच्यातर्फे 'इंडो–पाक पीस कॅलेंडर' छापले जात आहे. भारत–पाकिस्तान शांतता या विषयावर दोन्ही देशांतील मुलांनी काढलेली चित्रे मागवली जातात आणि त्यातील १२ चित्रांची निवड करून ती त्या वर्षीच्या दिनदर्शिकेमध्ये छापली जातात. २०२२ च्या दिनदर्शिकेसाठी कमला निंबकर बालभवनच्या विद्यार्थ्यांनी प्रथमच चित्रे पाठवली.

चित्र काढण्यापूर्वी कलाशिक्षक व चित्रकार रणजीतदादा कोकाटे यांच्याशी मुलांची सखोल चर्चा झाली. शांतता म्हणजे काय, ती कशासाठी हवी, चित्रातून कशी दाखवता येईल, कोणती प्रतिके वापरता येतील यावर उहापोह झाला. प्रत्येक विद्यार्थ्याचे चित्र वेगळे आणि शांततेच्या वेगवेगळ्या पैलूंना स्पर्श करणारे होते. सहावी ते दहावीच्या १६ विद्यार्थ्यांनी आपली चित्रे पाठवली.

भारत आणि पाकिस्तानमधून आलेल्या एकूण २७० चित्रांमधून गौरीचे चित्र अंतिम छपाईसाठी निवडले गेले. शांततेचे प्रतीक असलेले पांढरे कबूतर, दोन्ही देशांचे झेंडे आणि त्याभोवती एकमेकांत गुंफलेले विविध रंगांचे हात हे देखणे चित्र बंधुता आणि शांततेची सुखद अनुभूती देते.

द्वेषाने भारलेल्या या जगात शांततेच्या दिशेने मुलांनी टाकलेले हे एक पाऊल निश्चित स्वागतार्ह आहे.

कमला निंबर बालभवन, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत मे 2022

प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

**संपादक**
मधुरा राजवंशी

**संपादकीय सहाय्य**
अरुणा शेवाळे
विद्यादेवी काकडे
प्रियदर्शनी सावंत
पूनम वाघमारे

**मुखपृष्ठ**
'Let hands be held together Let peace prevail forever.'
गौरी घनवट, इ. १० वी

**मुखपृष्ठ व अंकमांडणी**
रमाकांत धनोकर
dhanokar@gmail.com

**रेखाचित्रे**
सोनल गायकवाड, इ. ६ वी.    झील कर्णे, जयकीर्ती रणदिवे इ. ७ वी
साक्षी हेंद्रे, नूतन सूर्यवंशी, रुचिता घनवट,  अभिनव काळे, निशांत जाधव,
प्रांजल पाटील, कैफ शेख, इ. ८ वी

अनेक कथा व कवितांची चित्रे त्या त्या लेखक व कवींनी काढलेली आहेत.

**रेखाटन मार्गदर्शक :** हर्षदा शिंदे

**संगणकीय अक्षरजुळणी :** पूनम वाघमारे

**मुद्रण:**  ग्रीन ग्राफिक्स,
सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे ४११०११

**प्रकाशन:** प्रगत शिक्षण संस्था, लक्ष्मीनगर, फलटण ४१५५२३
pragatshikshansanstha@gmail.com
www.pssphaltan.org

# प्रस्तावना

यंदाचे 'नवनीत' चे १९ वे वर्ष. १९९७ मध्ये मुलांच्या लेखनाने सजलेले पहिले नवनीत तयार होत होते तेव्हा त्याचा संपादक म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. माझ्यासाठी तो विद्यार्थीदशेतला फार मोठा अनुभव होता. माझे स्वतःचे लेखन तर त्यात छापले गेले होतेच पण त्यापेक्षाही एक संपादक म्हणून वेगळा अनुभव गाठीशी बांधता आला ज्याचा प्रभाव आजही कायम आहे. 'नवनीत'मधील लेखन आणि संपादन यामुळे माझी स्वतःची लेखनाबाबतची एक नीटशी घडी बसत गेली.

बालवाडी ते दहावीपर्यंतच्या मुलांच्या अभिव्यक्तीसाठी 'नवनीत' हे उत्तम व्यासपीठ आहे. इतक्या लहान वयापासून मुलांना व्यक्त व्हायला आणि त्यांचे विचार मांडायला 'नवनीत'ची साथ आहे जी मुलांना कायम लिहिती करत राहते.

मुले व्यक्त होतात– बोलण्यातून, लेखनातून, चित्रांतून आणि यातूनच त्यांचे भावविश्व आपल्या समोर येते. त्यांचे अनुभव, कल्पना कधी कधी आपल्यालाच अवाक करून टाकतात. यंदाच्या 'नवनीत'मध्ये मुलांनी अनुभवलेल्या कोरोना काळाचे प्रतिबिंब स्पष्ट दिसत आहे. आयुष्यातली मजा, नातीगोती यासोबतच मनात खोलवर दडलेले काही अगदी निरागसपणे मुलांनी कागदावर उतरले आहे, जे वाचताना मुलांना व्यक्त होऊन किती बरे वाटत असेल याची जाणीव आपल्याला येते. मुलांना त्यांच्या मनातील खदखद, वेदना, त्यांचे जगणे मुक्तपणे कागदावर उतरवावेसे वाटावे यासाठी लागणारा अवकाश आणि विश्वास त्यांना शाळेत मिळतो, जो त्यांच्या आयुष्यासाठी फार मोलाचा आहे.

शाळेत कायमच मुलांच्या घरच्या भाषेचा सन्मान केला जातो. 'नवनीत'मधील मुलांच्या घरच्या भाषेतले लेखन वाचताना मजा येते. खूप अस्सल वाटते ते.


'नवनीत'साठीचे लेखन ही झटपट घडणारी प्रक्रिया नसते तर अनेक वेळा आपल्या अनुभवावर, कल्पनांवर मुले विचार करत असतात आणि हळूहळू मनातले नेमक्या शब्दांत टिपत असतात. शाळेत मुलांच्या लेखनाचे कौतुक तर होतेच पण त्यांच्याशी बोलून लेखन अधिक प्रभावीपणे कसे मांडता येईल याची चर्चाही सुरू असते. मग एका परिच्छेदापासून सुरू झालेला लेखनप्रवास बराच लांब जातो आणि आपण आपला अनुभव उत्तमरित्या मांडू शकलो याचे समाधान मुलांच्या चेहऱ्यावर दिसून येते.

आज एक पालक म्हणून मला प्रकर्षाने जाणवणारी एक गोष्ट म्हणजे मुलांच्या लेखन विचारासाठी आवश्यक असणारा मुलांशी आपल्या सर्वांचा संवाद. मूल जाणून घेण्यासाठी आणि खुलवण्या–फुलवण्यासाठी संवाद हा पूल आहे. म्हणूनच आपल्या मुलांशी संवाद घरी आणि शाळेत कधीच बंद पडू देऊ नये. मुलांचे अनुभव, कल्पना, निरीक्षणे, शिवाय मनात असणारे अनेको प्रश्न यांना वाट मिळावी आणि मुक्त संवादातून त्यांनी अधिकाधिक व्यक्त होत राहावे या आशेसह हा अंक आपल्या हाती ठेवत आहोत.

**प्रकाश अनभुले**
माजी विद्यार्थी, कमला निंबकर बालभवन
कार्यकारी अधिकारी, प्रगत शिक्षण संस्था

# अनुक्रमणिका


१ रंगपंचमी / ५
२ एक बी लावू मित्रा / ५
३ गाय / ६
४ इवलंसं वासरू / ६
५ गाय विकताना / ७
६ सायकल / ७
७ पाऊस येतो / ८
८ पाऊस / ८
९ शेजारीण / ९
१० आई / १०
११ बिंगोचा मोबाईल / १०
१२ कोरोनाच्या म्हणी / ११
१३ अगं अगं सुट्टी / ११
१४ गव्हाची दारी / १२
१५ कुणामुळे? / १२
१६ मी आणि वॅन्सी / १३
१७ डाक्टर जी की सुई / १४
१८ पप्पांनी चालवले डोके / १४
१९ खेल का किस्सा / १५
२० छिपकली की करतूत / १५
२१ बिल्ला / १६
२२ पव्हायचा किस्सा / १७
२३ ती भयावह रात्र / १८
२४ रंगपंचमीची मजा / १९
२५ लूसी / २०
२६ अशी विकली भाजी / २१
२७ मी होणार पोलिस / २२
२८ शेतात / २३
२९ शेतात / २३
३० वह डरावना दिन / २४
३१ लसीकरण / २५
३२ आयुष्य / २६
३३ बहीण / २६
३४ तीन रुपयांचे कुलूप / २७
३५ Baba / 28
३६ Scarecrow / 28
३७ My Cooking / 29
३८ My Mango orchard / 29
३९ Doctor-Doctor / 30
४० My Chilli Plant / 30
४१ Fighter / 31



## रंगपंचमी

आली आली रंगपंचमी आली
पप्पांनी वेगवेगळे रंग आणले
शिवमचे केले तोंड लाल
अर्णवचे केले हिरवे गाल
स्वरा, नयन पिचकारी घेऊन आली
सर्वांनी मिळून मज्जा केली.

**–अर्णवी बोके**
बालवाडी मोठा गट (आपली शाळा)

## एक बी लावू मित्रा

एक बी लावू मित्रा,
त्याचे होईल झाड मित्रा,
मोठे झाल्यावर त्या झाडाची,
फळे आपण खाऊया.

**– अपूर्वा अहिवळे**
बालवाडी मधला गट
(आपली शाळा)




मी माझ्या फ्रेंडसोबत व दीदीसोबत रंगपंचमी खेळले. मी पिचकारीने रंग उडविले.

**–तस्मिया पठाण**
बालवाडी मधला गट

## गाय

एक होती गाय
तिला होते चार पाय
पण मला दिसत आहेत दोनच पाय!
मुले म्हणत होती, ते कसं काय?
***
पळायला लागली टन–टन
चारा हवाय पटकन!
आहे ते छोटसं वासरू
नाव आहे त्याच बिंगरू!
***
मुलांबरोबर खेळते
टुनू टुनू पळते!
म्हणते म्हे म्हे
अर्थ त्याचा–
काय झालं माझ्या बाळा?
चला आता खेळायला पळा!

**– स्वरा कुमठेकर,**
इयत्ता चौथी



## इवलंसं वासरू

इवलंसं वासरू
त्याला कसं विसरू?
रोज यायचं मळ्यात
घंटी होती त्याच्या गळ्यात.
शेतात दुडुदुडू धावायचं
माझ्यासोबत खूप खेळायचं
अचानक आजारी पडलं
आम्हाला सोडून गेलं
डोळ्यात आलं चटकन पाणी,
त्याचं चित्र माझ्या मनी.
त्याच्या आठवणीत व्हायचे मी मग्न,
मनात विचार आला, होईल का त्याचा पुनर्जन्म?
इवलंसं वासरू
त्याला कस विसरू?
जाते जेव्हा रानात
त्याचा विचार येतो मनात

**प्रिया काकडे,**
इयत्ता सहावी


# गाय विकताना

मागच्या वर्षी कोरोनामुळे आमची गाय विकायला काढली होती. अनेक व्यापारी, शेतकरी येऊन बघून गेले. ते गाईचे निरीक्षण करायचे. गाईची कास, कणा, रंग, सड, दात, शिंग बघायचे. कास जास्त सुजलेली, लाल सड असली तर जास्त किंमत येते. दात पडलेले नसले पाहिजेत. दात नीट नसले तर गाईला चारा नीट चावता येत नाही, पचन होत नाही त्यामुळे ती दूध कमी देते. त्यामुळे गाय विकत घेताना तिचे दात बघतातच. शिंग असलेली गाय घेत नाहीत. भुंडी गाय पसंत करतात. कारण भुंडी गाय मारत नाही. मारले तरी शिंग नसल्यामुळे इजा होत नाही. गाईचे ऑपरेशन झाले असेल तर कमी किंमत येते. एकदा एका गाईच्या पोटात गेलेले लोखंड काढायला पंधरा हजार खर्च झालेला. आणि ती गाई फक्त पाच हजारलाच विकली गेली.

एक व्यापारी आमची गाय विकत घायला आला होता. त्याने विचारले, किती येतं झाली आहेत? तेव्हा आम्ही सांगितले की गाईची चार वेतं झाली आहेत. मग त्याने विचारले, दूध किती लिटर देते? आम्ही सांगितले, एका टायमाला आठ लिटर देते. सकाळ–संध्याकाळ सोळा–सतरा लिटर होते! व्यापाऱ्याने पप्पांना पन्नास हजार सांगितले. पप्पा म्हणाले, एक्कावन हजारला डन करा. गाय जाताना आमच्या डोळ्यातून पाणी आले.

**प्रज्वल कोलवडकर, सार्थक भिसे,** इयत्ता सहावी

## सायकल



मी सायकल खूप जोरात चालवतो त्यामुळे आई मला रागवते. मी कधी कधी पडतो. कधीकधी खूप लांब जातो. सायकल असते चालवायला सोपी. आणि मला सायकल खूप म्हणजे खूप आवडते. अजूनही मला सायकलवरती बसल्यावर खूप छान वाटते. त्या सायकलीने मला आतापर्यंत खूप मदत केली. माझी आई मला जास्त सायकल देत नाही. तरीही मी खूप खुश असतो. माझ्या सायकलचे टायर खूप जाडे–जुडे आहेत. माझ्या सायकलीला एक ब्रेक नाही. पण माझी सायकल एका ब्रेकने थांबते. आणि मी खूप मोठे मोठे स्टंट करतो.

– **शंभूराजे जाधव,** इयत्ता पहिली



## पाऊस येतो


पाऊस येतो रिमझिम रिमझिम
कधी धो धो पडतो
सर सर धावतो
पावसात नाचतात मुले छानदार
वीज चमकली की घरात बसतात गपगार
विजा थांबल्या की पटकन बाहेर पळतात
सारखं करतात आत बाहेर, बाहेर आत
पाऊस येतो रिमझिम रिमझिम

**– रितेशा बोके,**
इयत्ता पाचवी

## पाऊस

पावसाळा सुरू झाला होता. सगळीकडे पाणीच पाणी झालेले होते. सगळी झाडे ओलीचिंब व हिरवीगार झाली होती. मातीचा सुगंध येत होता. सगळे मोर बाहेर आले होते. त्यांच्या रंगिबेरंगी पिसाऱ्यांसोबत नाचत होते. नाचताना ते खूपच सुंदर दिसत होते. हळूच एका झाडामागून पाच कोकिळ आले. सगळे मोर कोकिळांकडे बघू लागले. कोकिळ गाणे गाऊ लागले. सगळे पावसाचा आनंद घेऊ लागले.

**संहिता भुजबळ,**
इयत्ता तिसरी





# शेजारीण

खूप दिवसापासून एक छोटीशी पिवळ्या आणि राखाडी रंगाची पक्षीण घरासमोरच्या झाडावर, खिडकीजवळ फिरत होती. तिचा आवाज खूप नाजूक होता. तिच्या लांब चोचीतून येणारा चिवचिव आवाज आला की मी बाहेर जायची. तिला पाहून मला खूप आनंद होत होता. ती रोजच येऊ लागली. मला वाटल की ती खाऊ शोधायला येत असेल. पण तस नव्हतं तिच्या डोक्यात वेगळाच प्लॅन होता.काय बर असेल? माहित आहे का? पक्षीणबाई तिच्या घरासाठी जागा शोधत होती.

मग काय माझ्या पक्षीणबाईने घरट्याचे बांधकाम सुरु केले. खिडकी शेजारी आकाशकंदिलाच्या काठीवर घरटे बांधायला सुरुवात केली सुरुवातीला पक्षीणबाईने दोऱ्याचे तुकडे शोधून आणले. त्यात काही लीकारीचे पण होते. दोरा आणि लोकरीचे तुकडे आकाशकंदिलाच्या काठीला अडकवले. पक्षिणबाई बांधण्याचे साहित्य रोज थोडं थोडं गोळा करीत होती. कधी कापूस, कधी वाळवलेल गवत, कधी कागदाचे तुकडे, कधी पोत्याचा दोरा. हे सगळे साहित्य अडकवलेल्या दोऱ्याला लावून तिनं घरटं बांधायला सुरुवात केली. घरटे बांधायला ७–८ दिवस लागले. पक्षीणबाईनी घरट्यात ऊन, पाऊस लागू नये म्हणून मऊ मऊ गवताची छत्री तयार केली.मग काय बाईसाहेब आता आरामशीर, सुंदर अशा घरट्या राहू लागल्या. पण काय झाल काय माहित? पक्षीणबाई घराच्या बाहेर येतच नव्हती. का बरं बाहेर येत नसेल?

एक दिवस अचानक गंमत झाली. सकाळ सकाळ मला चिवचिव असा आवाज येऊ लागला. मी पटकन बाहेर गेले कट्ट्यावर चढले आणि पाहते तर काय? माझ्या पक्षीणबाईला दोन चिमुकली पिल्ली झाली होती. ती खूप चिवचिव करीत होती. त्यांना पाहून मला खूपच मज्ज्ञा आली. पक्षीणबाई चोचीने पिल्लांना खाऊ भरवत होती. ते पाहून मला खूप खूप आनंद झाला. माहित आहे का? कधी कधी पिल्ल्यांचे जांभळ्या रंगाचे बाबापण पिल्लांना खाऊ घेऊन येत होते. बाबा आल्यावर पिल्ले चांगलीच खुश होत होती. पण या पक्षिणीच नाव काय बर असेल? शाळेतल्या ताईंना पक्षीणबाई बद्दल विचारल्यावर त्यांनी सांगितलं या सुंदर, लांब चोचीच्या पक्षिणीच सूर्यपक्षी हे नाव आहे.मला पक्षीणबाईंच सूर्यपक्षी हे नाव खूप आवडलं.पण सगळ्यात जास्त आनंद याचा झाला की माझ घर आणि सूर्यपक्षीच घरी अगदी शेजारी शेजारी आहे.

– **मिताली महामुनी,** इयत्ता तिसरी



## आई

आई गं आई, जास्त काम करू नकोस
तू पाय दुखवून आणशील गं
दवाखान्यात जा गं तू
औषध गोळ्या खा गं तू
आई गं, माझा अभ्यास घे ना
दिदीचा व दादाचाही अभ्यास घे ना
बाबा आले, बाबा आले,
त्यांना चहा पाणी देते
बाबा ओ बाबा, तुम्ही काय काम केले ते सांगा

**–मनस्वी अभंग,**
इयत्ता तिसरी

## बिंगोचा मोबाईल

दोन दिवस झाले मला बिंगो शाळेत दिसला नाही. मधुरा ताईंनी माझ्या आईला विचारले तुम्हाला बिंगो दिसला का? आई म्हणाली नाही. नंतर माझ्या आईने, साई दादाने आणि मधुरा ताईंनी बिंगोला शोधायला सुरुवात केली आणि बिंगो कोर्टाच्या गेटसमोर सापडला.

मी माझ्या आईला म्हणालो की बिंगोच्या गळ्यात मोबाईल असायला पाहिजे होता. म्हणजे आपण त्याला फोन केला असता आणि बिंगोने तो फोन उचलून तो कुठे आहे ते सांगितले असते, आणि आपल्याला बिंगो सापडला असता.



**–श्लोक यादव,**
इयत्ता पहिली

## कोरोनाच्या म्हणी

इतनी सी जान, पूरी दुनिया हैरान
आयत्या पेशीत कोरोना
आपल्या तो ठसका, दुसऱ्याचा तो कोरोना
हँडवॉशपेक्षा सॅनिटायझर बरा
उचलला मास्क लावला कानाला
आधीच आळशी, त्यात लॉकडाऊन
मुले मागतात सुट्टी एक महिना,
कोरोना देतो आठ महिने
घरोघरी कोरोनाची भीती
दुसऱ्याला देई सल्ला,
आपला मास्क हनुवटीला

इ. नववी

## अगं अगं सुट्टी

अगं अगं सुट्टी,
तुझी माझी बट्टी
नको इंग्रजी मराठी
नको गणिताची पाटी

मध्येच आला कोरोना
मला घरात करमेना
बैठे खेळ खेळवेना
मित्र–मैत्रिणी भेटेना

शाळा बंद, बागा बंद,
मैदाने बंद, तलाव बंद
मैदानी खेळ हाच माझा छंद
खेळण्याचे सगळे मार्गच बंद

बाहेर जायला मनाई
नाहीतर होई धुलाई
मैत्रीण झाली आई
भातुकली खेळायला येई

बाबा झाले मित्र
काढायला शिकवती चित्र
कॅरम शिकले भरभर
बुद्धिबळही खेळलो रात्रभर

संपला आता कोरोना
शाळेशिवाय करमेना
नको मला तू सुट्टी
तुझी माझी आता कट्टी

**– श्रीशा गायकवाड**, इ. तिसरी




## गव्हाची दारी

मी आणि मम्मी रानातल्या गव्हाची दारी धरायला जातो. मला गव्हाची दारी धरायला आवडतात. मी दारी धरतो तेव्हा मातीचा खूप छान वास येतो. दारा गच्च भरला असेल तर फक्त चिखल लावून काम भागते. नाही तर दारा तुंबायला उसाचे पाचट लागते. मगच ते तुंबते. दारी तुंबायला लागली की चिखलाच्या पाण्याचा स्पर्श खूप छान वाटतो. थंडगार पाण्यात खूप मजा येते. पाण्यात खेकडे, गोमपण दिसतात. मी फक्त दिवसाच पाण्यात उतरतो. रात्रीचे बळेपण पाण्यात उतरत नाही. कारण गोम चावते, किडे पायावर चढतात.

रानात रात्रीचे कुत्र्याचे विव्हळणे ऐकू येते, टिटवीची टिवटिव ऐकू येते. कधी कधी आमची मांजर लपतछपत येते आणि ओरडते. खूप छान आवाज येतात.

**जय बनकर,** इ. चौथीत असताना

## कुणामुळे?

शाळा झाली ऑनलाईन आमची
शाळा झाली ऑनलाईन तुमची
कुणामुळे? या कोरोनामुळे.

बेंच नाहीत बसायला
फळा नाही लिहायला
कुणामुळे? या कोरोनामुळे.

प्रश्न विचारा ऑनलाईन
उत्तर द्या ऑनलाईन
कुणामुळे? या कोरोनामुळे.

ऑनलाईन शाळेत नाही मजा
मुलांना वाटे मिळत आहे सजा
कुणामुळे? या कोरोनामुळे.

ताई नाहीत शिकवायला
मित्र नाहीत खेळायला
कुणामुळे? या कोरोनामुळे.

**– अथर्व खाडे,**
इ. पाचवीत असताना



## मी आणि वॅन्सी

मी माझ्या कुत्र्याला वॅन्सी असे म्हणायचे. तो माझा लहानपणीचा मित्र होता. पप्पांनी त्याला मी पहिलीत असताना आणलेला, तेव्हापासून मी त्याला ओळखत होते, आणि तोही मला ओळखत होता. वॅन्सी आला तेव्हा तो पांढरा, गुबगुबीत आणि छोटासा होता. आम्ही रोज खेळायचो. वॅन्सी, बॉल आण! म्हणाले की तो पळत जाऊन बॉल घेऊन यायचा.

एके दिवशी मी वॅन्सीला घेऊन फिरायला गेले होते. तेव्हा एक मुलगी सायकल वरून जाताना दिसली. माझ्या डोळ्यासमोर चित्र उभे राहिले की मी सायकल चालवत आहे आणि वॅन्सी माझ्या मागे बसला आहे. मी के करायचे ठरवले.

आम्ही घरी गेल्यावर मी सायकलवर बसले. मी वॅन्सीला म्हणाले, अरे तू कसा बसणार? मग मी त्याला मागच्या सीटवर बसवले आणि त्याला म्हणाले, तू मला धरून बस. पण वॅन्सी खूप घाबरला आणि थरथर कापायला लागला. मग मी तो प्लॅन कॅन्सल केला.

सुट्टीसाठी माझी बहीण मुंबईहून आली होती. ती म्हणाली, तुझा डॉगी किती छान आहे! मी आपले असेच म्हणाले, तुला पाहिजे का? तर ती म्हणाली, हो, दे मला. मला खूप दु:ख झाले. पण मी तिला वॅन्सी दिला. मग ती त्याला मुंबईला घेऊन गेली. आता वॅन्सी खूप मोठा झाला असेल. वॅन्सी, तू खुश राहा.

**प्रगती पवार,** इयत्ता पाचवी

## डाक्टर जी की सुई

ठंडी आई, इमली लाई।
मैंने खाई तो खाँसी हो गई।
डाक्टर जी ने कहा,
अब दो दिनों तक स्कूल नहीं।
बाद में चुभोई सुई
मैं 'आई आई' करती घर आई।
भाई बोला, अच्छा हुआ तुम्हें सुई चुभोई।
अब दिनभर रहो बिस्तर पर सोई।
एक दिन करके हिम्मत मैंने इमली खाई।
और ये क्या भाई !
ना जुखाम, ना खाँसी
मैं तो वैसे की वैसी।
अब तो मैं इमली से डरती नहीं
क्योंकि काम कर गई डाक्टर जी की सुई!

**– श्रेयस आडके,**
कक्षा पाँचवी



## पप्पांनी चालवले डोके


पप्पांचे स्कूल बसचे काम
कोविडमुळे मिळाला त्यांना आराम
पण पप्पा आमचे गप्प बसतात तर!
त्यांनी उघडले वॉशिंग सेंटर
पप्पांनी अजून डोके चालवले तुफान
टमटम मध्ये सुरू केले भेळीचे दुकान
आणखी कशाने करावा उदरनिर्वाह?
पप्पांनी चालू केले रसवंती गृह
विचार करत होते आणखी काय करू?
तेवढ्यात झाल्या शाळा सुरू
तरी अजून विचार आहे वडापावच्या गाड्याचा
मला वाटतो अभिमान माझ्या पप्पांचा!

**–साया साळवे,**
इयत्ता सातवीत असताना

# खेल का किस्सा

एक बार हम क्रिकेट खेल रहे थे । हमारी टीम ने टॉस जीतकर बल्लेबाजी चुनी। तब हमने दूसरी टीम के सामने सत्ताईस रनों का लक्ष्य रखा था। वे बल्लेबाजी अच्छी कर रहे थे । उनके छब्बीस रन हो गए । आखिर की विकेट रह गई थी और जीत के लिए उन्हें एक ही रन चहिए था । जयकीर्ती बल्लेबाजी कर रहा था और मै गेंदबाजी। मैंने गेंद डाली । वो जयकीर्ती ने उछाली और रन लेने के लिए भागा । मैंने गेंद उठाकर स्टंप को मारी लेकीन वह स्टंप पर लगी ही नही । फिर भी मैं 'आउट' चिल्लाया । जयकीर्ती डर गया की कहीं वह आउट तो नहीं हुआ । लेकिन उसका रन पूरा हो गया और वे जीत भी गए । उस दिन खेल में मजा बहुत आया । हमने हार–जीत छोडकर उस दिन दोस्ती को देखा । मेरे दोस्त जीते उससे भी मुझे बहुत ख़ुशी हुई ।

**आदिश दोशी,** जब कक्षा ५ में था




# छिपकली की करतूत

एक दिन रात में प्यास लगी तो मैं उठ गई। मेरे बराबर में मेरी छोटी बहन सो रही थी। मैंने देखा कि उसके पेट पर एक छिपकली सो रही है। मै बहुत डर गई। मैंने मेरे पापा को जगाया। पापा उठे तो मैंने उन्हें कहा कि वो देखो, वहाँ छिपकली है। फिर पापाने उसे भगाने की कोशिश की तो छिपकली भागकर मेरे बिस्तर में छिप गई। पापाने बिस्तर को हिलाया तो वो छिपकली मेरे पैर के ऊपर से चली गई। मैं डर के मारे चिल्लाने लगी। छिपकली मेरी आवाज सुनकर बेड के नीचे भाग गई। मेरी बहन को तो मुझसे भी ज्यादा डर लगता है छिपकली से, लेकिन वह गहरी नींद सो रही थी तो उसे कुछ समझ नही आया।

मैं सुबह उठी तो मैंने मेरी बहन को बताया कि उसके पेट पर छिपकली बैठी थी। ये सुनकर वो हैरान हो गई। फिर हम सब मिलकर हँसने लगे। मुझे ये किस्सा याद आता है तो मुझे बहुत हँसी आती है।

**समृद्धी मोहिते,** कक्षा ७

# बिल्ला



एके दिवशी आमच्यात माझ्या बाबांनी एक शेळीचे पिल्लू आणले. आम्ही त्याला रोज बॉटलने दूध पाजायचो पण ते खूप ओरडायचे. मग आम्ही त्याच्या आईला विकत घेतले. मग ते करडू ओरडायचे राहिले. मी त्याचे नाव राणी ठेवले. राणी मोठी होऊन गाभण राहिली. मी तिला गोळीभुश्श्याचे खुराक लावले. राणी धष्टपुष्ट शेळी झाली. मग एके दिवशी ती व्यायली. तिला तिच्यागतच बिटल जातीची पाट झाली. मला ती खूप आवडली. मी तिचे नाव सारा ठेवले. साराचे तिच्या आईगतच लांब नाक आणि मोठे कान होते. डोळे सशागत पांढरेशुभ्र होते. हळूहळू साराही धष्टपुष्ट शेळी झाली आणि गाभण राहिली.

एके दिवशी मी शाळेत असताना सारा व्यायला झाली आणि शाळा सुटल्यावर मला बाबांनी सांगितले की आपली सारा व्यायली. बोकड झाले आपल्या साराला. मी खूप खूप खूप आनंदी झालो. घरी जाईपर्यंत मला चैन पडत नव्हते. मी बाबांना गाडी जोरात चालवायला सांगितले. घरी पोहचल्यावर मी बोकडाला बघायला पळतच गेलो. बोकड दिसायला खूप खूप चिकणे होते. त्याचे नाक पोपटागत, चिंचेच्या आकड्यागत लांब, मोठे होते. त्याचे कान सेम त्याच्या बाबांवर गेले होते. मी बाबांना म्हणालो, आता हे बोकड विकायचे नाही. आता हे बोकड आपल्याला घरीच ठेवायचे.

रात्री जेवण करून झाल्यावर मी त्याला नाव काय ठेवायचे म्हणून नावे शोधत होतो. टीव्हीवर पिक्चर चालू होता. त्यात हीरोचे नाव बिल्ला होते. मला ते नाव खूप आवडले. मग मी बोकडाचे नाव बिल्ला ठेवले. मी बिल्लाला रोज बॉटलने दूध पाजायचो. बिल्ला माझ्या मागे मागे, मी जिकडे जाईन तिकडे यायचा. बिल्ला धष्टपुष्ट ताकदवान बोकड झाला. त्याला कोणी बघितले की म्हणायचे, बोकड विकायचा आहे का? मला खूप राग यायचा. माणसांना त्याला हात लावू वाटायचा पण माणसे त्याला हात लावायला खूप घाबरायची. बिल्लाची ऐटच अशी होती की रस्त्याने जाताना लोक त्याच्याकडे टकाटका बघायचे. मग त्याला दृष्ट लागू नये म्हणून मी त्याला दृष्टेची माळ करून घातली.

बाबा मला एके दिवशी म्हणाले की आता आपला बोकड विकायचा आहे. ही गोष्ट कळल्यावर मला खूप राग आला, दु:ख झाले आणि मी बिल्लाच्या गळ्यात पडून खूप खूप रडू लागलो. मी रडत आहे म्हणून बिल्लाही रडायला लागला. मी दोन दिवस जेवलो नाही. नुसताच बिल्लाच्या गळ्यात पडून रडायचो. मग माझी आई बाबांना म्हणाली, पोराचा बोकडावर जीव आहे. बोकडाचाही त्याच्यावर जीव आहे. तुम्ही बोकड विकू नका. बाबांनी बिल्लाला विकायचे रद्द केले. मग मी इतका खुश झालो की मी बिल्लाबरोबर नाचायला लागलो. आम्ही दोघेजण असेच कायम खेळत खुश राहतो.

**– यश केंजळे,** इ. नववी

# पव्हायचा किस्सा


मी लॉकडाऊन मध्ये आमच्या शिंगणापूरच्या रोडला असलेल्या वडले या गावी गेलतो. तेव्हा उन्हाळ्याचे दिवस होते. बाहेर लय म्हणजे लय ऊन लागत होतं. म्हणून आम्ही बनियान आणि अंडरपँट घालून टीव्ही बघत बसायचो. रबराचे सोफे असल्याने घामामुळे सोफ्याला अंग चिटकायचं.

एक दिवस माझे पप्पा कामासाठी फलटणला गेलते. दुपारी फलटणवरून आल्यावर म्हणाले, अय पोट्टेहो! काय तुम्ही बटाट्यावानी उकडलायं... चला आपण जाऊ पव्हायला! पव्हायला म्हटलं की माझा, माझ्या मोठ्या भैयाचा आणि माझ्या बारक्या भावाचा नंबर पयला! आम्हाला लय म्हणजी लय पव्हायला आवडायचं. मला आणि माझ्या मोठ्या भैयाला भारी पव्हायला यायचं. पण बारक्याला कॅन्डाशिवाय पव्हायला येत नव्हतं. म्हणून त्यो पाय पोळत वाड्यात जाऊन एक बिना लिकीजचं कॅन्ड घेऊन आला. त्यो आणि मी लय वेळ कॅन्डाला बांधायला दोरी शोधत होतो. पण दोरी काय सापडली नाय. तेव्हा भैया म्हणाला, आरं दोरी व्हय? कासरा हाय की मळ्यातल्या शिडात. मंग आम्ही सगळं समान घेऊन पव्हायला निघालो.

जिवाव आल्यावानी कसंतरी विहिरीपाशी चालत पोचलो. मी कपडे काढणारच होतो पण तेवढ्यात मला माझ्या पप्पांनी उचलून विहिरीत फेकलं. मी पाण्यात पडल्यावर लगेच भैयानं माझ्या अंगावर उडी टाकली. आम्ही १–२ कोस तरी आत गेलो असणार. वर येताना लईच वेगळं वाटत होतं. जणू मी पाण्यातून निघून लाँचर रॉकेटला सोडतं तसं उडून जाणार. पण मी उडून नाय गेलो. मंग मी आणि भैया मस्त कॅन्ड धरून तरंगत बसलो.

पप्पांनी बारक्याला कॅन्ड बांधलं. त्याला गुडघ्याइतपत आत नेलं तेव्हा त्यानं माझ्या पप्पांचं पाय पकडलं आणि जोरजोरात ओरडायला लागला, आयोव मम्मे! वाचव की आगं मम्मे... लवकर ये... मेलो आता मी मेलो... माझं काय खरं नाय! काका, मी तुमचं पाय दाबतो, म्हणाल ते करतो. उलटं नाही बोलणार. मला नाय पव्हायचं. पाणी लय गार हाय. मी आजारी पडंल. माझ्याकडं पैसं नायत दवाखान्याला!

त्याचा हा सगळा ड्रामा बघून माझ्या डोळ्यातून शुद्ध जल वाहायला लागलं. एवढं हसलो, एवढं हसलो की काय बोलायलाच नको. नीट पव्हायला सुद्धा येत नव्हतं. असा होता माझा लॉकडाऊनमधला पव्हायचा किस्सा!



**–अभिनव काळे,**
इ. आठवी

# ती भयावह रात्र


१३ ऑक्टोबर २०२०. आम्ही सगळे गाढ झोपलो होते. अचानक घरात जळल्याचा वास येऊ लागला. माझा मामा उठला आणि त्याने त्याचा राऊटर बघितला. तो तर नव्हता जळला. तेव्हा रात्रीचे २.५० झाले होते. मामा स्वयंपाकघरातून पाणी पिऊन आला आणि त्याची नजर खिडकीवर पडली. तर खिडकीत सगळा जाळ! पूर्ण खिडकी भगवी दिसत होती. त्याने पटकन खिडकी उघडली. भपकन घरात धूर शिरला. मामाने खालच्या एका माणसाला ओरडून विचारले की काय झाले? तो माणूस म्हणाला, तुमच्या बिल्डिंगमधल्या गाड्या पेटल्या आहेत.

हे ऐकून मामा पटकन खाली जाण्यास निघाला. मामाच्या मागे पप्पा. ती आग एवढी जीवघेणी होती की दार पण नीट उघडता येत नव्हते. आगीच्या झळा वर दुसऱ्या मजल्यापर्यंत येत होत्या. मामा, मामी, मम्मी, पप्पा, बाबा, मा कसे बसे खाली उतरले. आमचे शेजारी आढाव काकापण त्यांच्या बायकोसोबत खाली उतरले. मी आणि दिदी फार घाबरलो होतो. दिदीने खिडकीतून आग पाहिली होती. मी आगीचे प्रतिबिंब बघितले होते. ते बघूनच मी फार घाबरले होते. आम्हा दोघींना कोणी खाली आगीच्या जवळ येऊ दिले नाही.

नंतर आम्हाला समजले की आमची आणि माझ्या मैत्रिणीच्या आईची टूव्हीलर कुणीतरी पेटवली होती. नशिबाने आमची गाडी निम्मीच जळाली होती. पण माझ्या मैत्रिणीच्या आईची गाडी पूर्ण जळाली होती. ती आग फारच भयंकर होती. आगीच्या पलीकडचे काहीच दिसत नव्हते. पार्किंगच्या अलिकडची फरशी तव्यासारखी तापली होती. आढाव काका पटकन दुसऱ्या बाजूला गेले आणि मोटार चालू करून पाईप लावला आणि आग विझवली. सगळ्यांना एकच भीती वाटत होती की जर पेट्रोलची टाकी फुटली तर बाकी गाड्या पण जळतील आणि मग आमची बिल्डिंगपण. जर हे झाले तर आपण कोणीच जिवंत राहणार नाही असे विचार सगळ्यांना मनात येत होते.

पण सगळे मनातल्या मनात त्या माणसाचे भले व्हावे असे म्हणत होते ज्याच्यामुळे आम्हाला कळले की गाड्या जळल्या आहेत. त्यानंतर पोलीस आले, आम्ही केस केली. पण अजूनही तो गुन्हेगार सापडलेला नाही.


त्या दिवशी आम्ही कोणीच झोपलो नाही. आमच्या बिल्डिंगमधलेही कोणीच झोपले नाही. ही माझ्या आयुष्यातील सर्वात भयंकर घटना होती.




**–प्रचिती दोशी,**

इ. नववी

# रंगपंचमीची मजा



रंगपंचमीचा दिवस. आम्ही सर्व कार्टी आशुतोषच्या घरी रंग खेळायला जमलो होतो. आम्हाला फुग्यांमध्ये पाणी भरायचं होतं पण आशुतोषच्या घरच्या बेसिनचा नळ खूप मोठा होता आणि पिंपाच्या नळातून फुगे भरत बसलो असतो तर दिवस गेला असता. तेवढ्यात आशुतोषला एक बेकार आयडिया सुचली. त्यानं तोंडात पाणी भरलं आणि तोंडाशी फुगा धरून त्यात पाणी सोडलं. संवेदनं तोंड वाकडं केलं आणि म्हणाला, छी छी! कसली भंगार पद्धत आहे ही! इतक्यात प्रांजल येऊन टपकला. आमचा सगळा कारभार बघून तो म्हणाला, अरं असलं काय करताय? चला माझ्या घरी २४ तास पाणी असतं. मग आमची सगळी पलटण प्रांजलच्या घरी गेली. फुगे भरून आम्ही आठजण जगदाळे सरांच्या घरी रवाना झालो.

आमचे प्रिय वर्गशिक्षक जगदाळे सर यांचा त्या दिवशी वाढदिवस होता, आणि आम्हाला सरांसोबत रंगही खेळायचा होता. जाता जाता सरांसाठी भेट म्हणून ट्रायमॅक्सचा पेन घेतला. पेन होता ५० रुपयांचा. आमच्याकडे फक्त ४० च रुपये होते. १० रुपये ऋषिकेश नंतर देईल असं दुकानदाराला सांगून ऋषिकेशला अडकवलं. (मला वाटतं त्यानं अजूनही पैसे दिलेले नाहीत.)

सरांचं घर जवळच होतं. पण आम्ही रेंगाळत चाललो होतो. आमच्या पिशवीत पाण्याचे पन्नासेक फुगे असतील. जाता जाताच आमची मस्ती सुरू झाली. वर्धननं एक फुगा घेतला आणि प्रांजलला मारला. प्रांजलनं संवेदला फुगा मारला. तो संवेदच्या पाठीवर बसला. मग संवेद पिसाळला आणि त्यानं प्रांजलच्या डोक्यात फुगा मारला. संवेद साईरामला फुगा मारतच होता तेवढ्यात साईराम बोलत बोलत खाली वाकला. फुगा लांब गेला आणि समोर एक गाडीवाला थांबला होता त्याच्या जवळ जाऊन फुटला. थोडंसं पाणी त्याच्या अंगावर उडालं. तो लागला कलाकला करायला! आम्ही हसायला लागलो आणि सायकली जोरात पळवल्या.

सरांच्या घराजवळ पोचेपर्यंत फुगे निम्मे झाले. घर जवळ आल्यावर अचानक ऋषिकेश सायकलवरून उतरला आणि मागे मागे पळायला लागला. आम्ही विचारलं काय झालं तर तो म्हणाला, अयू... तिथलं कुत्र लई जोरात चावतं. मग आम्ही सगळेच घाबरून उलटं पळालो आणि दुसऱ्या बाजूनं गेलो.

एकदाचे आम्ही सरांच्या घरी पोहचलो पण बघतो तर सरांच्या घराला कुलूप! आम्ही खूप नाराज झालो. मग सरांच्या घराच्या दाराच्या जाळीतून आम्ही पेन आत सारला. एका फुग्यावर हॅपी बर्थडे लिहून हार्ट पण काढलं होतं पण तो फुगा काय आम्हाला तिथे ठेवता आला नाही.

परत येताना लई ऊन लागत होत. आशुतोषला इतकं गरम होत की त्यानं एक पाण्याचा फुगा स्वतःच्या डोक्यावर फोडून घेतला. मग आम्ही सगळे खूप रंग खेळलो आणि चंदेरी होऊन घरी गेलो.

संध्याकाळी आम्ही सरांना फोन केला. सर म्हणाले, तरी मी म्हणत होतो दारात पेन कुठून आला? आम्ही सगळे खूप हसलो.

**–निशांत जाधव,** इ. आठवी

# लूसी


लॉकडाऊनमध्ये एक छोटसं, गोंडस, पांढरंशुभ्र, गुबगुबीत कुत्र्याचं पिल्लू पप्पांनी आणलं. त्याच नाव काय ठेवायचं यावर चर्चा चालू होती. माझा छोटा भाऊ सिद्धार्थ म्हणाला की आपण तिचं नाव स्वीटी ठेऊया. मी विचारलं, का बरं त्याचं नाव स्वीटी ठेवायचं? तो म्हणाला आगं येडे ती मादी हाय ना! कोणी म्हणत होतं की तिचं नाव राणी ठेवा, तर कोणी म्हणे तिचं नाव बाळी ठेवा. सिद्धार्थला तुम्ही बाळा म्हणता ना म्हणून मग तिचं नावं बाळी. सगळे नावं सुचवत होते. पण मला कुठलंच नाव आवडत नव्हतं. मग मला एक नाव आठवलं– लूसी. ती पांढरीशुभ्र होती म्हणून तिला लूसी नाव शोभत होतं.

लूसी दोन–अडीच महिन्यांची झाली. मी तिला कुठं बाहेर फिरायला नेलं आणि मला कुणी तिचं नाव विचारलं की मी ‘लूसी’ सांगायचे. पण लोकांना तिचं नाव लस्सीच ऐकू यायचं. मला खूपच वाईट वाटायचं तिला कोणी लस्सी म्हणलं की.

आम्ही रात्री अंथरूण टाकायला लागलो की ती यायची आणि अंथरूण तोंडात धरून आख्ख्या घरात पाळायची. मी आणि सिद्धार्थ झोपायला लागलो की आमच्याकडे पळतच यायची. सिद्धार्थ म्हणायचा, डायनॉसॉर आला रे! झोपा! आम्ही पांघरूण तोंडावर घेतलं की ती अंगावर उड्या मारून उठवायची.

लूसी बघता बघता पाच महिन्यांची झाली. एकदा तिनं कुठंतरी घाण पाणी प्यायलं आणि तिला गॅस्ट्रो झाला. तिला आम्ही रोज सकाळ–संध्याकाळ सलाईन लावायला न्यायचो. तिला १५–२० दिवस सलाईन लावली.

मी रोज सकाळी उठून पहिले तिला बघायचे पण त्या दिवशी ती मला दिसलीच नाही. मी मम्मीला विचारलं लूसी कुठंय तर मम्मी म्हणाली तिला दवाखान्यात सलाईन लावली आहे. मला वाटलं की खरंच सलाईन लावली आहे. मग मला डॉक्टरांचा फोन आला. डॉक्टर म्हणाले की ती माझ्याजवळ आहे. काही काळजी करू नको.



एक महिना झाला. मम्मीला मी विचारलं, लूसी कधी येणार आहे? मम्मी काहीच नाही बोलली. शेजारचा एक माणूस येऊन म्हणाला, तुझं कुत्र मेलं ना? दुसरं का नाही आणलं? मी रडायला लागले. मग सिद्धार्थनं एक दुसरं सेम टू सेम पिल्लू आणलं. त्याचं नाव पण लूसीचं ठेवलं. ते आता दीड वर्षांचं आहे.

पण माझ्या जुन्या लूसीला मी अजून नाही विसरले...

**– श्रावणी मोरे,** इ. आठवी

# अशी विकली भाजी

दोन वर्षांपूर्वीची ही गोष्ट. लॉकडाऊन होते. बाहेर कोणीही येत नव्हते. कोणीही बाहेर आले की त्यांना पोलीस दंड करायचे किंवा खूप मारायचे. त्या लॉकडाऊनमध्येही आम्ही घराच्या बाहेर भाजीचे दुकान लावायचो. पोलिस आले की लगेच गाडे पळवायचो.

एके दिवशी गल्लीच्या दोन्ही बाजूंनी पोलिस आले. मम्मी मला आणि माझ्या बहिणीला म्हणाली, लवकर घरात जावा, पोलिस आलेत. आम्ही आत गेलो. पोलिस बायकांना मारत नव्हते पण पुरुषांना मारायचे त्यामुळे पप्पा पण घराच्या मागे गेले.


पोलिस मम्मीवर ओरडले, तुम्हाला कळत नाही का? लॉकडाऊन आहे तरी तुम्ही दुकान लावताय! तुमच्यासारख्या माणसांमुळेच कोरोना वाढतोय. त्यांनी ५०० रुपये दंड केला. पोलिस गेल्यावर आम्ही लगेच बाहेर आलो आणि दुकान बंद केले. मम्मी विचार करत होती की आता मालाचे काय करायचे. थोडा घरी, थोडा योद्धा अकॅडमीच्या मेसला, थोडा मावशीला, थोडा शेजारच्या काकांना असे करत माल खपवला.

एकदा पप्पा कलिंगड आणि टरबूज घेऊन बिरदेवनगरकडे गेले. तेवढ्यात तिथला एक माणूस पॉझिटिव्ह आल्याचे समजले आणि पोलिसांनी तो भाग सील केला. कसेतरी सुटून पप्पा घरी आले.

मग आम्ही गिरवी नाक्यावर गाडे लावायला लागलो. पण तिथे कोणीही नसायचे. कधी–कधी एखादे गिऱ्हाईक यायचे. हळूहळू गिऱ्हाइकांना कळायला लागले की इथे फळे व भाजीपाला मिळतात. मग लोक गल्ली–बोळातून यायला लागले. आमचा एवढा धंदा होत नव्हता. आम्हाला गाडीचे पेट्रोलही मिळत नव्हते. आम्ही शेतकऱ्यांच्या घरी जाऊन माल आणायचो तरीही माल शिळा व्हायचा. २–३ वेळा माल फेकून द्यावा लागला.

हळूहळू सगळे सुरू झाले. आता आमचा व्यवसाय नीट चालला आहे.

**–सिद्धार्थ मोरे,**
इ. सहावी



# मी होणार पोलिस



मी मोठेपणी पोलिस होणार आहे. आमच्या कुंभार कामात खूप कष्ट आहेत. कोणतेही काम असूदे, आमचा घाम निघायचा तो निघतोच कारण आम्ही काम करायला बसलो की सलग दीड तास तरी अनलिमिटेड काम करतो. आम्ही जेव्हा पायाने माती मळतो तेव्हा मातीत बगॅस टाकल्यामुळे आमचा पाय आतमध्ये जात नाही. त्यामुळे आम्हाला माती मळायला कधी–कधी दोन तासही लागतात. माती आणि बगॅस नीट एकत्र व्हायलाच लागते. त्यामध्ये थोडे जरी कमी जास्त झाले तर आपण बनवतोय ते भांडे मोडून जाते. जर माझ्याकडून काही मोडले तर मला पप्पा खूप खवळतात त्यामुळे मी खूप जपून काम करतो, मग त्याला चार तास का लागेनात.


लॉकडाऊनवेळेस मी जेव्हा शाळेची ऑनलाईन मीटिंग जॉईन करायचो तेव्हा माझे आजोबा म्हणायचे की त्यांच्या हाताखाली काम करायला कोणी नाही. त्यामुळे मला मीटिंग सोडून आजोबांच्या हाताखाली काम करायला जायला लागायचे.

जर शाळेला सुट्टी असेल तर मला फक्त दीड ते दोन तासच खेळायला मिळते कारण मला पप्पा खूप काम सांगतात आणि त्यांना जर चुकून म्हणालोच की मी काम नाही करणार तर पप्पा मला इतके खवळतात की कधी कधी त्यांचा ओरडा खाऊन माझ्या डोळ्यातून पाणी येते.

माझ्या बारक्या भावाचे सांगायला गेलो तर तुम्ही हसाल कारण माझे पप्पा त्याला काहीच बोलत नाही. त्याला काम सांगितले की तो खूप राग–राग करतो. मी राग करत नाही म्हणून सगळे मलाच कामे सांगतात. मला फक्त गणपतीची मूर्ती रंगवायला खूप आवडते.

मला या सगळ्यांना पोलिस बनून दाखवायचे आहे आणि दहशत कमवायची आहे. म्हणजे मग मला कुणी घरची कामे सांगणार नाही.

**–सिद्धीराज कुंभार,** इ. आठवी



## शेतात

शेतात वातावरण निसर्गरम्य
बघण्यात मी झाले मग्न

लिंबाच्या झाडाखाली शेतात
भाजी भाकरी नेली गाठोड्यात
सुगरण झाडावर बसली,
पिल्लांना चारताना मला दिसली

शेतात कष्टाचं पीक डुलतं,
वाऱ्याला झालाय आनंद प्रचंड
वासरांची चालली मस्ती,
बैलांना रवंथ करीत आली सुस्ती ।।२।।

कडक पडलंय ऊन
सावलीत भाकरी झाली खाऊन,
तिथेच झाडाच्या खोडाशी हात धुऊन
शेतकरी गेला गाढ झोपून

–**झील कर्णे,** इ. सातवी

## शेतात

शेतात गेलं की मला वाटतं शांत
पक्ष्यांचा किलबिलाट ऐकून माझं मन गातं
शांतता मला खूप आवडते
ती मला शेतात मिळते
शेतातल्या चिंचा आहेत गोड
माझं मन त्यांना पाहून म्हणतं, तोड
चिंचाना मीठ लावून खायला मज्ज़ा येई
कुठेही फिरलं तरी अशी मज्ज़ा मिळणार नाही

–**संस्कृती मुळीक,** चौथी




## वह डरावना दिन


२०१८ में जब तूफान आया था बारिश वाला, तब मै चौथी में था । हमारा परिवार दो मंजिला घर में रहता था। तूफानवाले दिन सुबह आठ बजे से लेकर चार बजे तक सूरज की किरणें चमक रही थी। मैं दोपहर में सोकर उठा, इस आशा में कि चलो, चार बज गए। खेलने जाऊँगा दोस्तों के साथ। लेकिन जैसे ही मैंने हाथ मुँह धो लिए और बाल्कनी में गया, बरसात होने लगी। मैंने सोचा होगी थोडी सी, लेकिन बरसात बहुत ज्यादा बढ़ गई। मैं डर कर घर के अंदर चला गया। मन में बोला, ये बिन मौसम बरसात कैसे होनी लगी? तभी मेरी दादी बोली, तूफान आनेवाला है।

हवा इतनी तेज चल रही थी कि कोई बच्चा रस्ते पर खडा हो तो उड़ जाए! मैं बाल्कनी से झांककर काले बादलो की ओर देखता था तो ऐसा लागता था कि कहीं बाढ़ न आ जाए। बारिश की टप टप, बादलो का धडाम धडम, तूफान की वह ठंडी हवा, जो किसी को भी जकड़ ले, मुझे और भी डरा रही थी।

तभी जोर से बिजली कडकी। मैं घबराकर अंदर आ गया और भीगी बिल्ली की तरह बेड के नीचे छुप गया। उफ्फ! कितना डरावना दिन था वह!

**साई यादव,** कक्षा सातवी

# लसीकरण



मी जेव्हा दहा वर्षाचा होतो तेव्हा शाळेत ‘गोवर–रुबेला’ लस दिली जाणार होती. हे मला माझ्या वर्गशिक्षिका प्रिया ताईंकडून कळाले. मी ताईंना विचारले, ताई लस कशी आणि कशातून दिली जाणार आहे? ताई म्हणाल्या, इंजेक्शन मधून दंडाला लस दिली जाणार आहे. इंजेक्शनचे नाव ऐकताच माझ्या हृदयाचे ठोके जोरजोरात पडू लागले. मी घरी गेल्यावर मम्मीला सांगितले की माझ्या पोटात दुखत आहे म्हणून मी उद्या शाळेत जाणार नाही. पण पप्पांना कारण समजले की मी शाळेत जायला नको का म्हणत आहे. सर्वांनी मला बोलून बोलून हैराण केले. मग मी शाळेत जायला तयार झालो. रात्री झोप येत नव्हती. सारखे इंजेक्शन समोर दिसत होते. मग मी मनात म्हटले, सकाळचे सकाळी बघू. आता झोपून घेऊ.

शेवटी दिवस उजाडला. आज लस दिली जाणार होती. शाळेत गेल्या गेल्या आम्हाला लगेचच ओळीत उभे केले. माझा रोल नंबर तर एक! माझे टेन्शन अजूनच वाढले. सुवर्णा ताईंनी आवाज दिला, तन्मय चल. पप्पा माझ्या जवळ आले. त्यांनी माझ्या हाताला धरले आणि दुसरीच्या वर्गात लस द्यायला नेले. मी आतमध्ये खुर्चीवर जाऊन बसलो. इंजेक्शनची तयारी सुरू झाली. नर्सताईंनी फ्रीजरमधून एक डोस बाहेर काढला. सुईत भरला. आता मला घाम फुटला. सुई जवळ येऊ लागली तसा मी आरडा–ओरडा सुरू केला आणि खुर्चीतून उठून पळायची तयारी केली. पण मला पप्पा, विशाल सर आणि सुशांत सर या तीन जणांनी खुर्चीत धरून ठेवले. आता नर्सताई सुई टोचवणार तेवढ्यात मी एक जोरात लाथ मारली. सुई नर्सताईंच्या हातात घुसली. त्यांच्या हातातून रक्त येऊ लागले. आता नर्सताई चिडल्या आणि माझा हात जोरात पकडून त्यांनी सुई खुपसली. मी ओरडत डोळे बंद केले. पप्पा म्हणाले, झालं. चला आता.

मी डोळे उघडले तेव्हा बघितले की माझे डोके पप्पांनी धरले होते, पाय सुशांत सरांनी धरले होते, आणि हात विशाल सरांनी धरले होते. नर्सताईंच्या हातात मोकळे इंजेक्शन दिसत होते. मला समजले की आता आपल्याला इंजेक्शन देऊन झाले. सगळे माझ्याकडे बघत होते आणि हसत होते.

आता दोन वर्षांनी कोरोनाच्या लशीची चर्चा सुरू झाली. शाळेतल्या इयत्ता नववी व दहावीच्या मुलांना लस दिली गेली. म्हटले चला, आज ना उद्या आपला नंबर असणारच. एक दिवस आमच्या व्हॉट्सॲप गटावर मेसेज पडला की बारा वर्षे पूर्ण असणाऱ्या मुलांना कोविड लस दिली जाईल. मला बारा वर्षे पूर्ण होती म्हणजेच माझा नंबर पक्का होता.

लशीच्या दिवशी मी साडेबाराला शाळेत पोचलो. पाच मिनिटांत लस देणार होते. मी ओळीत चौथा होतो. पुढच्या तिघांना लस दिली पण त्यांना काहीच त्रास झाला नाही. त्यामुळे मला जरा बरे वाटले. माझा नंबर आला. मी खुर्चीत जाऊन बसलो. नर्सताईंनी इंजेक्शन हातात घेतले. मी खिडकीतून बाहेर बघितले. लस दिलेली मला कळाले देखील नाही.

**तन्मय अनभुले,** इ. सहावी

# आयुष्य

बाबा वारले. आई धक्क्यात होती. मी खूप लहान होतो. आईला सहा महिने झोपेच्या गोळ्या चालू होत्या. आईला कळत पण नव्हते की आपल्याला मुले आहेत. काही दिवसानंतर आई भानावर आली. मामाने आम्हाला सिद्धेश्वर कुरवली वरून फलटणला आणले. आईला कंपनीत नोकरी लागली. पण ती खूप शिकलेली नव्हती म्हणून तिला चांगले काम लागले नाही. मामाने माझे व माझ्या ताईचे ॲडमिशन शेती शाळेत केले. शाळेत साधी पिण्याच्या पाण्याचीही सोय नसायची. पण आई म्हणायची, आता असंच चालायचं बाळा! तुझे बाबा कुठे आहेत? मला खूप वाईट वाटायचे. दुसऱ्या मुलांचे आई–बाबा त्यांना चांगल्या शाळेत घालत असतील, आधार देत असतील. ते आपल्या वाट्याला नाही असे वाटायचे.

काही दिवसांनी मामाने भांडण काढले व आम्हाला घरातून बाहेर काढायचा प्रयत्न केला. पण आजी–आजोबांनी ते होऊ दिले नाही. आईला कमला निंबकर बालभवन शाळेमध्ये काम लागले. मला पण तिथे शाळेत घेतले. आईला चांगले पेमेंट यायला सुरुवात झाली आणि शाळा खूप चांगली होती. खूप चांगले शिक्षण असायचे. आमचे चांगले चाललेले मामला बघवले नाही. त्याने आम्हाला आणि आजी–आजोबांनाही बाहेर काढले. पण आईने जेव्हा पोलिसांना बोलवेन असे सांगितले तेव्हा त्याने आजी आजोबांना घरात घेतले.

आईने दुसरे घर पाहिले. तिला माझ्या मावशीने खूप साथ दिली. आम्ही भाड्याने राहू लागलो. ताई दहावी पास झाली तेव्हा आईला व मला खूप आनंद वाटला. मीही ठरवले आहे की आपणही मागे नाही फिरायचे. स्वत:चे अस्तित्व बनवायचे व आईला खुश ठेवायचे.


**–यश साठे,** इ. सातवी



# बहीण

पुढच्या जन्मी डोळे उघडता सर्वात आधी
चेहरा तुझाच पाहावा,
लहानाचे मोठे होताना हाती हात तुझाच असावा.
कधी डोळ्यात अश्रू आले तर ते पुसण्यासाठी
सगळ्यात पहिले तूच हवी,
तुझी सोबत मला नेहमी अशीच रहावी.
कधी थकले, कधी हारले तर,
'अशी काय बसलीस? चल उठ!' म्हणणारीही तूच असावी,
मला स्वत:पेक्षा जास्त समजणारी व्यक्तीपण तूच असावी.
माझ्या मनात काय सुरू आहे
हे मी न बोलता जाणणारी तूच असावी,
रुसले असता रुसवा हक्काने घालवणारीही तूच असावी.
घाबरले असता हातामध्ये तुझा हात घेऊन झोपावे,
तुटले असता तू मला सावरावे.
माझ्या चेहऱ्यावर अगदी चटकन हसूही तूच आणावे.
संकटात माझी ढालही तूच बनावे
प्रत्येक जन्मी माझी बहीण म्हणून तूच असावी,
तुझ्याविना दुसरी कोणीच नसावी.

**प्रचिती दोशी,** इ. नववी



# तीन रुपयांचे कुलूप

उजाडले होते. पक्ष्यांचा किलबिलाट चालूच होता. खिडकीतून सूर्याची किरणे येत होती. मी उठून बसलो होतो. रविवार असल्यामुळे शाळा काही नव्हती. मात्र शाळेचा अभ्यास राहिलेला तो पूर्ण करायचा होता. घरातले सगळे जण आपापला उद्योग पाहत होते. मी सुद्धा लगबगीने उठलो आणि एका तासात स्वतःचे आवरून बसलो. चविष्ट नाश्ता केला.

म्हटले की संध्याकाळी खेळायला जायचे असेल तर अभ्यासाला बसायलाच पाहिजे. म्हणून दप्तर घेऊन आलो. एक शब्द लिहायला आणि आजोबा यायला एकच गाठ पडली. मला माहीत होते की यांचे माझ्याकडे काहीतरी काम असणार. आधी उठलो आणि आजोबांना पाणी आणून दिले. आजोबा म्हणाले, आपल्याला स्टोअर रूम उघडायची आहे, तू लगेच चल. आम्ही गेलो. स्टोअर रूम जुनाट पडलेली होती. तिचा पत्रा गंजलेला होता. कुलुपाकडे पाहताच आजोबांनी सांगितले की त्यात ऑइल सोडावे लागेल. मी लगेच एका फटक्यात ते काम करून टाकले.


स्टोअर रूम घराच्या बाहेरच्या बाजूला असल्यामुळे ऊन तावत होते. पक्ष्यांचा किलबिलाट थांबलेला होता. सगळीकडे शांतता होती. त्यात मी आजोबांना प्रश्न विचारला, का उघडायची आहे ही स्टोअर रूम? काही समान बाहेर काढायचं आहे रे राजा, आजोबांनी सरळ भाषेत उत्तर सोडले. मी चावी फिरवली पण कुलूप निघालेच नाही. परत एकदा फिरवली तरी सुद्धा निघाले नाही. तेवढ्यात आई–बाबा भाजी घेऊन आले. बाबांनी सुद्धा प्रयत्न करून पाहिला पण कुलूप काही केल्या निघेना. आजोबा म्हणाले, ''लोहा गरम है, मार दो हथौडा!'' बाबांनी चार–पाच वेळा हातोडा मारला पण कुलूप तुटेना. मग बाबा कामाला निघून गेले आणि हातोडा माझ्या हातात आला. रस्त्यावरच्या गाड्यांचा आवाज येत होता. शेजाऱ्यांची काहीतरी कुजबुज चालू होती. मी कुलुपाला ठोके द्यायला लागलो. हा खेळ बराच वेळ चालू होता. ठिबक सिंचनाला पाणी दिल्यासारखे माझ्या अंगावरून घामाचे थेंब ठिबकत होते.

मला एक कल्पना सुचली. मी शेजारच्या काकूंकडून एक्सापान घेऊन आलो. ते सुद्धा अर्धे तुटलेलेच होते. कुलुपावर कराकरा एक्सापान घासायला लागलो. पण ऑइल सोडल्यामुळे त्या एक्सापानचा काहीच उपयोग झाला नाही. खरे म्हणजे ते कुलूप काढणे माझ्यासाठी अशक्यच झाले होते. थोडा वेळ खाली बसलो. आजोबा म्हणाले, तुझं हे काम नाही, मी बोलावतो मिस्त्रींना. मग तर मला खूपच राग आला. परत कुलुपावर घाव घालायला सुरुवात केली. एक एक करत कुलुपाची एक बाजू मी विस्कटली होती. दोन तास उभे राहून, एवढे त्या कुलुपाला झटूनसुद्धा ते तुटेना. गरमीने सुद्धा बैचेन केले होते. मी पूर्ण घामाघूम झालो होतो. सगळे प्रयत्न बेकार गेले. या कुलुपाने तर माझे डोकेच खाल्ले होते. आजोबा म्हणाले, दमला होय?'' मी चिडून जोरात घाव घातला तो कुलुपाला बसलाच नाही. दुसरा घाव पण तिसरीकडेच गेला. आजोबा, आई, धाकटा भाऊ व शेजारचे माझ्यावर हसायला लागले. मी इतका संतापलो होतो की तिसरा घाव इतक्या जोरात, नेमदार आणि जीव खाऊन मारला की ठोका बसताच कुलुपाचे दोन तुकडे झाले आणि माझ्या हाताला पत्रा कापला. रक्त येऊ लागले. आजोबांनी आईला हळद आणायला लावली. आईने माझ्या हातावर हळद लावली. आजोबा मला म्हणाले, वा रे मेरे शेर! खूप चांगलं काम केलंस तू. मी खुश झालो आणि आजोबांना लागणारे सामान काढून दिले.

मग आजोबांनी एक आश्चर्यचकित करणारी गोष्ट सांगितली. ती म्हणजे ते कुलूप तीनच रुपयांचे होते. मला त्या कुलुपाचे नवलच वाटले. तीन रुपयांच्या त्या जुन्या कुलुपाने माझा दम काढला होता. स्टोअर रूमच्या दाराला नवीन कुलूप लावून मी अभ्यास करायला गेलो.

**गौरव साळवी,** इयत्ता ९वीत असताना

## Baba



I called my grandfather Baba. He was 70 years old when he passed away. He was like a child. I loved him. He looked younger than his age. His life was very simple.


In summer holidays my three cousin sisters came to Phaltan. So, we were five children. We had a lot of fun. We drank lassi and ate mangoes. Baba couldn't enjoy these things because he had diabetes. Aaji had told him," No sweets!" But Baba was very stubborn. He wanted to eat sweets.

One day when Aaji was sleeping in the afternoon, he went behind the house and drank lassi. He came back and put the empty pouch of lassi near me. When Aaji asked who drank it he said, "I don't know. The kids must have drunk it." He lied and and Aaji shouted at us. She ordered me to throw the empty pouch in the dustbin.

Once we went to our farm. There are many mango trees. Baba always wanted to eat mangoes. He thought if he ate mangoes then children will tell to Aaji and Aaji will scold him. So, he requested us not to tell Aaji. Then he started eating a mango. While eating some mango pulp fell on his shirt and his shirt got a yellow stain. So, Baba washed his shirt in the farm, dried it and then wore it. It was fun. Aaji never found out. Now I remember all these things and miss him.

**-Sharayu Mane,** 9th

---




## Scarecrow

A scarecrow stands in the fields
Its head is a pot,
and legs are bamboo sticks.
He is wearing a half pant
And an old shirt
He is standing day and night
to scare away the birds

**-Takshashil Ahiwale**, 7th

# My Cooking



When I was 12 years old I wanted to cook food but I had never cooked before. So I said to my mother, “Mamma, please teach me cooking.” My younger brother Pratik started to laugh. I said, “In my class almost all girls can cook.” My father said, “Why are you inviting the trouble?” “What do you want to say, papa?” I asked. He said, “Don't learn cooking otherwise after some days your mother will say the she is tired and you should do all the cooking.” I laughed and agreed.

But slowly my family members started suggesting that I was an older girl now and I must cook. My grandma said to me, “You are in the 7th grade now. Shruti is younger than you but still she can cook.”

One day my mother had gone to her mother's home. I was very hungry. I checked all the tins in the kitchen. Some were empty and some had groceries in them. I could not control my hunger. I wanted to eat something delicious. I decided to make pohe which is my favourite food. I had learned the recipe of pohe from my cousin sister. I started to make pohe. In the process I burnt my hand a little. As the mouth-watering smell spread in the house my confidence grew. I was very happy as I had cooked tasty pohe for the first time. This was a secret. My family didn't know about my little adventure. I knew that if I told my mother she would tell me to make pohe all the time.

One day my mother had a headache. She could not do any work. Pratik and I were hungry, so I made pohe. I served hot pohe in a dish and gave it to my mother. She was shocked! She hugged me. I cook with full confidence now.

**Saniya Kakade, When in 9th**


---

# My Mango orchard



My mango orchard is nice
When I visit it I feel alive
The orchard is green,
There are a lot of fruits
I will pick up some mangoes
And make tasty juice

**-Sara Bansode,** 7th



## Doctor-Doctor

When I was in balwadi after school I stayed in the hospital where my mother worked. She was a nurse. At that time nobody was at home to take care of me. My elder brother went to school and my father went for work. So I had to stay with my mother. I watched all her movements- how she gave injections to the patients and how she put saline.

One Saturday it was holiday and all of us were at home. My friend Tanvi and her younger brother Kartik had come to play. Tanvi was a year younger than me. I suggested that we play doctor-doctor. Tanvi and Kartik agreed. I was the doctor, Tanvi was the nurse and Kartik was the patient. I took one empty bislery bottle and made a hole in its cap. From the hole I took out a thread and at its end I tied a needle. The saline bottle was ready.

Kartik came to my hospital and said, "I am sick." I hung the saline bottle to a tree and ordered him to lie down. I was about to put needle in Kartik's hand when fortunately my mother came running and stopped me. A lot of scolding and weeping followed.

From the next day my mother put me in the day care centre and never took me to the hospital till I became mature.

**Shreya Devkar, When in 9th**

---

## My Chilli Plant

One day I sowed a chilli seed
I sowed it in a pot,
cause I didn't have a field
My plant grew tall
I showed it to all
I waited for days and hours
Finally came little flowers
Everything was going great
The chillies grew straight
I plucked some chillies
and ate them finally!

**-Samruddhi Mohite, 7th**



# Fighter

Tears were like weapons
That came out of my eyes
Gave me hundreds of wounds
And destiny taught me to read minds.

People who were so close yesterday
Did not remain mine
How could they go empty-handed?
Left tears in my eyes.

Now I am afraid of being attached to anyone
Afraid that they will show their true colours in the end
Why did I waste my time caring for those,
who labelled my character without any base?

Tears gave me cuts
which remind me of the past
Some puppets of other hands
Had broken my heart

Why I didn't understand this simple truth
That people keep using us till we are mute?

But now your turn is over
Now it's mine
Beware as your single mistake
Can bring storms in the silent times.

Don't go on my appearance
For I can be as silent as grave
and as loud as a storm
I will fight for myself,
A fighter I was born.

**Saie Kumthekar,** When in 9th

२०20 च्या पहिल्या लॉकडाऊनमध्ये घरी बसून मला कंटाळा आला होता. नवीन नवीन पदार्थ करायचा, चित्र काढायचा देखील कंटाळा आला होता. एक दिवस मोबाईलवर यूट्यूब बघत असताना मला एक व्हिडिओ दिसला. त्यात एक माणूस शाईने अक्षर सुलेखन करत होता. त्या माणसाचे अक्षर इतके सुंदर होते की, तो व्हिडिओ पाहून मला असे वाटले की, माझे अक्षर इतके सुंदर असते तर...? मग मी अक्षर सुलेखन शिकायचे ठरवले. यूट्यूबवर मी देवनागरी अक्षर सुलेखनचे व्हिडिओ बघायला लागले.


आईने मला एक निपचा पेन आणला. त्याने मी रोज सराव करू लागले. पहिल्यांदा सरळ रेषा, वक्र रेषा हे काढायला शिकले. नंतर हळू-हळू शब्द, मग वाक्ये. सुरुवातीला रेषा सरळ येत नव्हत्या. यूट्यूबमधल्यासारखे अक्षर यायचे नाही तेव्हा वाटायचे आता सोडून द्यावे. मग आई समजवायची की सरावाने हळूहळू येईल. आता मी मोठे मोठे परिच्छेददेखील लिहू शकते.

माझे अक्षर बघून लोकांचा विश्वासच बसत नाही की हे आठवीतील मुलीने लिहिले आहे. शाळेच्या वार्षिक प्रकल्प प्रदर्शनात प्रस्तावना गेली दोन वर्ष मीच लिहीत आहे. माझ्या या कौशल्याचा मला फार अभिमान वाटतो.

- तनिष्का इंदलकर
इ. आठवी

**Let the dream of Indo-Pak unity shine in every eye...**

**अनुष्का ढमाळ, इ. नववी**





द्वेष की धूप से एक दूसरे को बचाते हैं
एक ही बर्तन से खाना खाते हैं
एक साथ झूमते गाते हैं
दोस्त और क्या होते हैं?

**मतिन मणेर, इ. दहावी**

दो जिस्म एक जान
हिंदुस्तान– पाकिस्तान

**शिफा तांबोळी, इ. आठवी**





हिंदुस्तान और पाकिस्तान
मिलकर करें सुंदर नवनिर्माण

**श्रद्धा पवार, इ. दहावी**



आक्रमकता के झंडे उतरे,
दो यारों के हाथ मिल गए
दरवाजे दिलों के खुल गए

**भार्गवी कदम, इ. नववी**



एक नदी, पानी एक
दो देश, कहानी एक

**रुचिता घनवट, इ. आठवी**